# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २८/०८/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रा अंतर्गत वैद्यकिय आरोग्य विभागा मार्फत नागरी प्राथमिक् आरोग्य केंद्र १, २, व ४ अंतर्गत राज्यशासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनेनूसार "पॉलिक्लिनीक" ही संकल्पना **आज** दिनांक २८/०८/२०२३ रोजी ना.प्रा.आ. केंद्र २, नेहरू चौक उल्हासनगर २ येथे "पॉलिक्लिनीक" तसेच १५ वा वित्त आयोग अंतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र, (आपला दवाखाना) अमरधाम चौक उल्हासनगर -२ आज पासून सुरू करण्यात येत आहे. तरी यांचा उद्‌घाटन सोहळा आज दिनांक २८/०८/२०२३ रोजी मा. आमदार (उल्हासनगर) श्री. कुमार आयलानी साहेब यांच्या शुभ हस्ते व मा. प्रशासक तथा आयुक्त उमपा, श्री. अजीज शेख यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आले. सदर सोहळयास मा. उपायुक्त- वैद्यकिय आरोग्य विभाग-डॉ. सुभाष जाधव, मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी - डॉ. मोहिनी धर्मा, जनसंपर्क अधिकरी- श्रीमती छाया डांगळे, शहर कार्यक्रम व्यवस्थापक- डॉ. विद्या चव्हाण, शहर लेखा व्यवस्थापक- श्री. दिनेश सरोदे, "पॉलिक्लिनीक" अंतर्गत नियुक्त करण्यात आलेले सर्व विशेषतज्ञ डॉक्टर्स तसेच सर्व नागरी प्राथमिक आरोगय केंद्रातील, वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेल्या "पॉलिक्लिनीक" मार्फत स्त्रीरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, बालरोग तज्ञ, त्वचारोग तज्ञ, कान-नाक- घसा रोग तज्ञ, मानसोपचार तज्ञ, भिषक तज्ञ **व** इत्यादी तज्ञ सेवा शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनूसार जनतेला मोफत पूरविण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य वर्धीनी केंद्र (आपला दवाखाना) मार्फत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांस मोफत तपासणी, मोफत औषधे व मोफत उपचार तसेच आवश्यकतेनुसार तज्ञ व संदर्भसेवा देण्यात येतील असे मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी सांगितले तसेच मा. आमदार कुमार आयलानी साहेबांनी व मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी महाराष्ट्र शासनाच्या या महत्वकांक्षी योजनेचा सर्व उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले तसेच वैद्यकीय आरोग्य विभागास उर्वरित नागरी आरोग्य वर्धीनी केंद्र लवकरात लवकर सुरु करणेबाबत निर्देश दिले.

२८/८/२३

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.